**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय**

**जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती**

**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा**

**दिनांक ९/८/२०११**

**सायंकाळी ४.०० वाजता**

**स्थळ :- जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**

## जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती

मा. जिल्हाधिकारी, अमरावती महोदयांचे अध्यक्षतेखाली दिनांक ९/८/२०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजता संपन्न होणा-या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेची विषयसुची.

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे. | | दिनांक १८/३/२०११ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त सर्व सदस्याना व संबंधिताना पाठविण्यात आले असून ते सभेच्या मंजूरातीसाठी ठेवलेले आहे. | | |
| २. | दिनांक १८/३/२०११ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाहीचा आढावा :- | | | | |
| | १. एमआयडीसी अमरावती येथे पुरविण्यांत येत असलेले पाणी पिण्यायोग्य नसल्या बाबत.<br><br>(मुद्दा जिउमि सभा दिनांक २७/४/२००७ पासून प्रलंबीत) | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | अमरावती औद्योगिक क्षेत्राला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा रु. ४६.२० प्रति हजार लिटर्स दरा ऐवजी घरगुती वापराच्या दराने म्हणजे रु. १०.५० दराने व्हावा, या बाबत सभेत चर्चा सुरु आहे.<br>औद्योगिक क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याची आवश्यकता अत्यल्प म्हणजे दर दिवशी ३०० घन मिटर आहे. करीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी संयुक्तरित्या प्रस्ताव तयार करुन वरीष्ठ कार्यालयास सादर करावा, अशी सुचना दि. २९/७/२०१०, दिनांक १/१०/२०१० व १८/३/२०११ रोजीच्या सभेत करण्यांत आली होती.<br>एम.आय.डी.सी. क्षेत्राची पिण्याच्या पाण्याची आवश्यकता प्रति व्यक्ति १० लिटर या प्रमाणे एकूण ७५००० लिटर पाणी पुरवठा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास शक्य आहे. मात्र यासाठी अतिरिक्त पाईपलाईनची आवश्यकता असल्यामुळे अतिरिक्त पाईपलाईन टाकण्यांस मंजूरीकरीता एमआयडीसीने त्यांचे मुख्यालयास प्रस्ताव पाठवावा, असे ठरले होते. | मऔविम, अमरावती<br><br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती. | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | **२. सिपना कॉलेज ते एमआयडीसी नवीन रस्त्या बाबत.**<br><br>**(मुद्दा जिउमि सभा दिनांक २४/२/२००६ पासून प्रलंबीत)** | **एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती.** | **गोपाल नगरकडील ट्रक वाहतुकीचा भार कमी करण्याच्या दृष्टीने सिपना कॉलेज ते एमआयडीसी हा रस्ता करण्यांत यावा, अशी मागणी औद्योगिक संघटनने केली होती.**<br>**मागील सभेत ठरल्याप्रमाणे बडनेरा रोड ते मिनी बायपास रोड असा एक किलोमिटर रस्ता अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव खारीज करण्यांत आल्यामुळे नवीन प्रस्ताव महानगरपालिका, अमरावती यांनी भू संपादन विभागास सादर करावयाचा होता.**<br>**सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालीका, अमरावती यांनी दिनांक १/१०/२०१० चे पत्रान्वये कळविले आहे की राष्ट्रीय महामार्ग क्र.६ ते सिपना कॉलेज ते एम.आय.डी.सी. मिनी बायपास रोडला जोडणारा विकास योजनेतील १८.०० मीटर रुंद रस्त्याखालील जागा संपादनाचा प्रस्ताव त्यांनी दि. २४/८/२०१० रोजी जिल्हा प्रशासनाकडे दाखल केलेला आहे व त्यामधील त्रुटी दर्शविल्याप्रमाणे त्रुटीची पूर्तता करण्यांत आली आहे.**<br>**मागील सभेत मा. अध्यक्षांनी भू संपादन अधिकारी यांना त्वरीत कार्यवाही करण्याची व Section(4) देण्याची प्रक्रिया करण्याची सुचना केली होती.** | **महानगरपालिक ा , अमरावती.**<br><br>**भू संपादन अधिकारी, अमरावती.** | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | ३. एमआयडीसी परिसर व सातुर्णा औद्योगिक वसाहत परिसरात मोकळया गुरांचा बंदोबस्त करण्याबाबत.<br><br>(मुद्दा जिउमि सभा दिनांक १०/८/२००९ पासून प्रलंबीत) | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | स्वच्छता राखण्यासंदर्भात महानगरपालिकेची महत्वाची भूमिका आहे. करीता स्वच्छता मोहिम राबविण्यांत यावी, तसेच मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्याबाबतसुध्दा योग्य ती मोहिम राबवावी जेणेकरुन अटकाव होऊन अशा घटना होणार नाही, अशी सुचना पुन्हा महानगरपालिकाचे प्रतिनिधी यांना मागील सभेत करण्यांत आली होती. तसेच सदर विषयावर मा. आयुक्त, महानगरपालिका, अमरावती यांचेशी स्वतंत्ररित्या सदर विषयावर चर्चा करण्यांत आलेली आहे. त्यांनी त्यांच्या अधिका-यांना योग्य ती कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी अर्ध शासकिय पत्र दि.२८/४/२०११ अन्वये मा. आयुक्त, महानगरपालिका, अमरावती यांना याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. | महानगरपालिका, अमरावती. | |
| | ४. दर्यापूर येथे मुर्तिजापूर रोडवर अस्तित्वात असलेल्या उद्योगाकरीता सदर परिसर भारनियमनमुक्त करण्याबाबत.<br><br>(मुद्दा जिउमि सभा दिनांक १/१०/२०१० पासून प्रलंबीत) | मे. जयदुर्गा इंडस्ट्रीज, मुर्तिजापूर रोड, दर्यापूर व इतर उद्योग घटक | दर्यापूर येथील मे. जयदुर्गा इंडस्ट्रीज, मुर्तिजापूर रोड, दर्यापूर व इतर उद्योग घटकांनी दिनांक ८/९/२०१० चे पत्रान्वये मा. उद्योगमंत्री, म.रा. तथा पालकमंत्री, अमरावती जिल्हा यांना निवेदन सादर केले आहे, की दुर्गापूर तालुक्यामध्ये अंजनगांव रोडवरील औद्योगिक क्षेत्र येथे एकही उद्योग घटक अस्तित्वात नाही. तथापि मुर्तिजापूर रोडवर बरेच उद्योग अस्तित्वात आहे, परंतु तेथे औद्योगिक झोन घोषित केले नसल्यामुळे विद्युत भारनियमनाचा फटका तेथील उद्योगांना बसतो. करीता सदर परिसर भारनियमनमुक्त करण्यांत यावा, अशी मागणी केली होती.<br>मागील सभेत कॉमन फिडर असल्यामुळे लोड शेडींग बंद करता येत नाही तसेच सदर भागांत ६-७ उद्योग असल्यामुळे स्वतंत्र फिडर घ्यावे लागेल, अशी माहिती देण्यांत आली होती.<br>नवीन एक्सप्रेस फिडर उद्योग घटकाचे खर्चाने बसविल्यास, झालेला खर्च मराविविकंमने परत करण्याची तरतुद असल्याचे औद्योगिक संघटनेने मागील सभेत सुचविले होते. | मराविविकंम, अमरावती<br><br>मऔविम, अमरावती | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | | | सदर विषयावर तोडगा काढण्याकरीता औद्योगिक संघटनेने अधिक्षक अभियंता, मराविविकंम यांचेसोबत चर्चा करावी असे ठरले होते. | | |
| | ५. मे. एम.एम. ॲग्रो केमिकल्स, अमरावती या उद्योगास महानगरपालिके द्वारा ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत आलेले नाही, त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रमाणपत्र देत नसल्याबाबत.<br><br>(मुद्दा जिउमि सभा दिनांक १८/३/२०११ पासून प्रलंबीत) | औद्योगिक वसाहत सहकारी संस्था मर्यादित, सातुर्णा, अमरावती. | मे. एम.एम. ॲग्रो केमिकल्स हा उद्योग महानगर पालिकेच्या हद्दीत अनेक वर्षापासून अस्तित्वात आहे व त्यास ग्राम पंचायतद्वारे पूर्वी ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत आले आहे. त्या आधारावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे प्रमाणपत्र देण्यांत आलेले आहे. तथापि सदर क्षेत्र हे आता महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असल्यामुळे व सद्य:स्थितीतील नियमातील बदलामुळे महानगरपालिकेकडून त्यांना ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नाही. या कारणास्तव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे सदर उद्योगाला ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत येत नाही.<br>मागील सभेत मा. अध्यक्ष महोदया यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी यांना सुचना केली होती की सदर उद्योग ३० वर्षापासून सुरु आहे, तसेच महानगरपालिकेकडून उद्योग बंद करण्याच्या सुचना सुद्धा नाही. त्यामुळे अशा उद्योगांना ३१/३/२०११ पर्यंत ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची सुचना केली होती.<br>तसेच कार्यालयीन पत्र दिनांक २४/३/२०११ अन्वये सभेत ठरल्याप्रमाणे कार्यवाही करण्याची सुचना करण्यांत आली आहे. तसेच सदर उद्योग घटकाने दिनांक ४ एप्रील २०११ चे पत्रान्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती म.प्र.नि.मं., अमरावती यांना केली आहे. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | . |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| ३ | मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळवर येणारे विषय. | | | | |
| | १. उद्योग घटकांना जिल्हा सह निबंधक कार्यालयाद्वारा मुद्रांक शुल्क माफीची सवलत नाकारत असल्याबाबत. | १. मे. रुची एंटरप्रायजेस, अे-५८, एमआयडीसी, अमरावती<br>२. मे. डी. जी. कॉटसीन, धाबा. | मे. रुची एंटरप्रायजेस, अे-५८, एमआयडीसी, अमरावती , मे. डी. जी. कॉटसीन, धाबा या उद्योग घटकांना दिनांक २/८/२०११ चे पत्रान्वये असे कळविले आहे की त्यांना मुद्रांक शुल्क माफीची सवलत मिळण्याकरीता नवीन उद्योग घटक प्रमाणपत्र जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती या कार्यालयाद्वारा देण्यांत आले होते. तथापि दस्तऐवज नोंदणीकरीता जिल्हा सह निबंधक कार्यालयाशी संपर्क साधला असता त्यांना मुद्रांक शुल्क माफीस पात्र नाहीत, असे सांगीतले.<br>कार्यालयीन पत्र दिनांक २/८/२०११ अन्वये जिल्हा सह निबंधक, अमरावती यांना योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती करण्यांत आली आहे. | जिल्हा सह निबंधक, अमरावती | |

महाव्यवस्थापक,
जि.उ.कें. तथा
सदस्य-सचिव, जि.उ.मि.,
अमरावती.

## जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती

मा. श्री. जीतेंद्र पापळकर, अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दिनांक ९/८/२०११ रोजी सायंकाळी ४.० वाजता संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त.

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे. | | श्री. जी. ओ. भारती, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी उपस्थितांचे स्वागत करुन मा. अपर जिल्हाधिकारी, महोदयांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली.<br>दिनांक १८/३/२०११ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त सर्व सदस्याना व संबंधिताना पाठविण्यात आले असून ते सभेच्या मंजूरातीसाठी ठेवलेले आहे. कोणीही हरकत उपस्थित न केल्यामुळे सर्व संमतीने इतिवृत्त मंजूर करण्यांत आले.<br>सभेला उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे. | |
| २. | दिनांक १८/३/२०११ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाहीचा आढावा :- | | | |
| | १. एमआयडीसी अमरावती येथे पुरविण्यांत येत असलेले पाणी पिण्यायोग्य नसल्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | अमरावती औद्योगिक क्षेत्राला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा वाणिज्यिक दरा ऐवजी घरगुती वापराच्या दराने म्हणजे रु. १०.५० दराने व्हावा, या बाबतचा प्रस्ताव म.औ.वि. महामंडळ यांनी पाठविला होता. म.जी. प्रा. द्वारे बिगर घरगुती दराने म्हणजे रु. ४६.२० प्रति हजार लिटर्स दराने पाणी पुरवठा करण्यांत येईल, असे कळविण्यांत आले.<br>औद्योगिक संघटनेने पिण्याच्या पाण्याची आवश्यकता अत्यल्प म्हणजे दर दिवशी ३०० घन मिटर आहे, असे सांगीतले. करीता पुन्हा एकदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी संयुक्तरित्या प्रस्ताव तयार करुन वरीष्ठ कार्यालयास सादर करावा, असे मागील सभेत ठरले होते. तसेच या संदर्भात मा. जिल्हाधिकारी महोदयां यांची मा. सचिव, पाणी पुरवठा, सोबत चर्चा सुद्धा झालेली आहे.<br>म.जि.प्रा.चे प्रतिनिधी यांनी असे सांगीतले की एम.आय.डी.सी. यांनी कळविल्याप्रमाणे प्रति व्यक्ति १० लिटर याप्रमाणे पाण्याची आवश्यकता गृहीत धरल्यास एकूण ७५००० लिटर पाणी पुरविणे शक्य आहे. ७५००० लिटर पाण्याकरीता नवीन पाईप लाईन टाकणे अव्यवहार्य ठरते. | मऔविम<br><br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण<br><br>एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | | | मऔविमचे प्रतिनिधी यांनी ३ लाख लिटर पाण्याची आवश्यकता असल्याचे सांगीतले. त्यांना ३ लाख लिटर पाण्याच्या आवश्यकते बाबतच्या समर्थनार्थ स्पष्टीकरणासह प्रस्ताव मजिप्रास सादर करण्याची सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी केली.<br>मा. अध्यक्ष महोदय यांनी कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा. व कार्यकारी अभियंता, मऔविम, औद्योगगिक संघटनेचे प्रतिनिधी आणि महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांची दिनांक २२ ऑगष्ट २०११ रोजी दुपारी १२.०० वाजता सभा आयोजित करुन सदर विषयावर तोडगा काढण्याचे सूचित केले. | |
| | २. सिपना कॉलेज ते एमआयडीसी नवीन रस्त्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती.<br><br>अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | गोपाल नगरकडील ट्रक वाहतुकीचा भार कमी करण्याच्या दृष्टीने सिपना कॉलेज ते एमआयडीसी हा नवीन रस्ता करण्यांत यावा, अशी मागणी औद्योगिक संघटनने केली होती.<br>बडनेरा रोड ते मिनी बायपास रोड असा एक किलोमिटर रस्ता अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव खारीज करण्यांत आल्यामुळे नवीन प्रस्ताव महानगरपालिका, अमरावती यांनी भू संपादन विभागास सादर करावयाचा होता. सहा. संचालक नगर रचना, म.न.पा. यांनी राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ ते सिपना कॉलेज ते एम.आय.डी.सी. मिनी बायपास रोडला जोडणारा विकास योजनेतील १८ मीटर रुंद रस्त्याखालील जागा संपादनाचा प्रस्ताव दि. २४/८/२०१० रोजी जिल्हा प्रशासनाकडे दाखल केलेला आहे. तसेच त्यामध्ये असलेल्या त्रृटींची पूर्तता सुद्धा केली आहे.<br>मागील सभेत मा. अध्यक्षांनी भूसंपादन अधिकारी यांना त्वरीत कार्यवाही करावी तसेच Section (4) ची देण्याची प्रक्रिया करण्याची सुचना केली होती.<br>भू संपादन अधिकारी यांनी प्रस्तावानुसार प्रस्तावाचे रक्कमेच्या २५ टक्के म्हणजे रु. १.१० कोटीचा भरणा महानगरपालिकेने करावयाचा आहे, तसा प्रस्ताव महानगरपालिकेकडून प्राप्त झालेला नाही, अशी माहिती दिली.<br>मा. अध्यक्ष महोदय यांनी रु. १.१० कोटीची मागणी महानगरपालिकेने त्यांचे स्थायी समितीमध्ये ठेवावी व तशी तरतुद करावी, असे सुचविले. तसेच औद्योगिक संघटनांनी याबाबत महानगरपालिकाकडे पाठपुरावा करावा, असे सुचविले. | मऔविम<br><br>म. न. पा. |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | ३. एमआयडीसी परिसर व सातुर्णा औद्योगिक वसाहत परिसरात मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | स्वच्छता राखण्यासंदर्भात महानगरपालिकेची महत्वाची भूमिका आहे. करीता स्वच्छता मोहिम राबविण्यांत यावी, तसेच मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्याबाबतसुध्दा योग्य ती मोहिम राबवावी जेणेकरुन अटकाव होऊन अशा घटना होणार नाही, अशी सुचना पुन्हा महानगरपालिकाचे प्रतिनिधी यांना मागील सभेत करण्यांत आली होती. तसेच सदर विषयावर मा. आयुक्त, महानगरपालिका, अमरावती यांचेशी स्वतंत्ररित्या सदर विषयावर चर्चा करण्यांत आलेली आहे. त्यांनी त्यांच्या अधिका-यांना योग्य ती कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी अर्ध शासकिय पत्र दि.२८/४/२०११ अन्वये मा. आयुक्त, महानगरपालिका, अमरावती यांना याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. तथापि यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात नसल्याची माहिती सभेला देण्यांत आली.<br>औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधी यांनी काठेवाडी लोकांकडून त्यांनी मोकाट सोडलेल्या जनावरांना अटकाव केल्यास औद्योगिक परिसरामधील उद्योगामध्ये कार्यरत कर्मचारी यांच्यासोबत अरेरावी तसेच मारामारी करीत असल्याची माहिती सभेला दिली.<br>तसेच सभेला संबंधीत अधिकारी उपस्थित नसल्यामुळे सभेला माहिती मिळू शकली नाही. करीता मा. अध्यक्ष महोदय यांनी महानगरपालिकाचे प्रतिनिधी व पोलीस विभाग यांनी याबाबत संयुक्तरित्या कार्यवाही करण्याची सुचना केली. | महानगर पालिका , अमरावती. |
| | ४. दर्यापूर येथे मुर्तिजापूर रोडवर अस्तित्वात असलेल्या उद्योगाकरीता सदर परिसर भारनियमनमुक्त करण्याबाबत. | मे. जयदुर्गा इंडस्ट्रीज, मुर्तिजापूर रोड, दर्यापूर व इतर उद्योग घटक | दर्यापूर येथील मे. जयदुर्गा इंडस्ट्रीज, मुर्तिजापूर रोड, दर्यापूर व इतर उद्योग घटकांनी दिनांक ८/९/२०१० चे पत्रान्वये मा. उद्योगमंत्री, म.रा. तथा पालकमंत्री, अमरावती जिल्हा यांना निवेदन सादर केले आहे, की दुर्गापूर तालुक्यामध्ये अंजनगांव रोडवरील औद्योगिक क्षेत्र येथे एकही उद्योग घटक अस्तित्वात नाही. तथापि मुर्तिजापूर रोडवर बरेच उद्योग अस्तित्वात आहे, परंतु तेथे औद्योगिक झोन घोषित केले नसल्यामुळे विद्युत भारनियमनाचा फटका तेथील उद्योगांना बसतो. करीता सदर परिसर भारनियमनमुक्त करण्यांत यावा, अशी मागणी केली होती. | विषय बंद |

| | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | | | नवीन एक्सप्रेस फिडर उद्योग घटकाचे खर्चाने बसविल्यास, झालेला खर्च मराविविकंमने परत करण्याची तरतुद असल्याचे औद्योगिक संघटनेने मागील सभेत सुचविले होते. तथापि सदर तरतुद फक्त नवीन उद्योगांकरीता असल्याचे मराविविकंमचे प्रतिनिधी यांचेकडून स्पष्ट करण्यांत आले.<br>मा. अध्यक्ष यांनी मराविविकंमचे प्रतिनिधी यांना सदर फिडर करीता येणारा अंदाजीत खर्च कळविण्याची सुचना केली. | |
| | ५. मे. एम.एम. ॲग्रो केमिकल्स, अमरावती या उद्योगास महानगरपालिके द्वारा ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत आलेले नाही, त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रमाणपत्र देत नसल्याबाबत. | औद्योगिक वसाहत सहकारी संस्था मर्यादित, सातुर्णा, अमरावती. | मे. एम.एम. ॲग्रो केमिकल्स हा उद्योग महानगर पालिकेच्या हद्दीत अनेक वर्षापासून अस्तित्वात आहे व त्यास ग्राम पंचायतद्वारे पूर्वी ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत आले आहे. त्या आधारावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे प्रमाणपत्र देण्यांत आलेले आहे. तथापि सदर क्षेत्र हे आता महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असल्यामुळे व सद्य:स्थितीतील नियमातील बदलामुळे महानगरपालिकेकडून त्यांना ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नाही. या कारणास्तव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे सदर उद्योगाला ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत येत नाही.<br>मागील सभेत मा. अध्यक्ष महोदया यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी यांना सुचना केली होती की सदर उद्योग ३० वर्षापासून सुरु आहे, तसेच महानगरपालिकेकडून उद्योग बंद करण्याच्या सुचना सुद्धा नाही. त्यामुळे अशा उद्योगांना ३१/३/२०११ पर्यंत ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची सुचना केली होती.<br>म.प्र.नि.मं.चे प्रतिनिधी यांनी सदर उद्योग घटकांस ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याची माहिती. करीता सदर विषय सभेच्या विषयसूचीवरुन कमी करण्यांत आला. | विषय बंद |

| | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| ३ | मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय. | | | |
| | १. उद्योग घटकांना जिल्हा सह निबंधक कार्यालयाद्वारा मुद्रांक शुल्क माफीची सवलत नाकारत असल्याबाबत. | १. मे. रुची एंटरप्रायजेस, अे-५८, एमआयडीसी, अमरावती २. मे. डी. जी. कॉटसीन, दाभा | मे. रुची एंटरप्रायजेस, अे-५८, एमआयडीसी, अमरावती , मे. डी. जी. कॉटसीन, दाभा या उद्योग घटकांने दिनांक २/८/२०११ चे पत्रान्वये असे कळविले आहे की त्यांना मुद्रांक शुल्क माफीची सवलत मिळण्याकरीता नवीन उद्योग घटक प्रमाणपत्र देण्यांत आले होते. तथापि दस्तऐवज नोंदणीकरीता जिल्हा सह निबंधक कार्यालयाशी संपर्क साधला असता त्यांना मुद्रांक शुल्क माफी दिली नाही, असे कळविले आहे.<br>जिल्हा सह निबंधक, अमरावती यांनी माहिती दिली की मे. रुची एंटरप्रायजेस, या उद्योग घटकाचे नवीन उद्योग घटक प्रमाणपत्रात ज्या अद्यादेशाद्वारे मुदतवाढ दिली त्याचा उल्लेख मुद्राक शुल्क माफीचे प्रमाणपत्रात केल्यास, त्यानुसार सुट देण्यांत येईल.<br>मे. डी. जी. कॉटसीन, दाभा या उद्योग घटकाचे बाबत मुद्राक शुल्क माफीची सुट लागू नसल्याची माहिती दिली. तथापि त्याबाबत समाधानकारक स्पष्टीकरण सभेला देऊ शकले नाही. त्यांनी सदर प्रकरणांत निर्धारीत वेळेच्या आंत प्रकरणे निकाली काढावयाची असल्यामुळे निर्णय दिला असल्याची माहिती दिली व अर्जदारास याबाबत अपिलमध्ये जाण्याची मुभा असल्याचे सूचित केले.<br>औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधी यांनी जिल्हा सह निबंधक यांनी त्यांचे स्तरावर निर्णय न घेता वरीष्ठ कार्यालयास अपिल करावे, अशी अपेक्षा करावी, अशा प्रकारच्या कार्यवाही बद्दल नाराजी दर्शविली. तसेच सदर सवलत कोणत्या शासन निर्णयाद्वारे नाकारण्यांत आली याचे लेखी स्पष्टीकरण देण्याची मागणी केली. | जिल्हा सह निबंधक, अमरावती |

आभार प्रदर्शनानंतर मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभा समाप्त करण्यांत आली.

स्वा/-
अपर जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र.

स्वा/-
महाव्यवस्थापक,
जि.उ.कें. तथा
सदस्य-सचिव,
जि.उ.मि.,अमरावती.